...च्या सत्काराप्रसंगी डॉ. सुषमा पाटील, डॉ. कांचन लोकवाणी, प्रशांत

# ‘आयसीएआय’तर्फे विद्यार्थ्यांना जीएसटी, लेखापरीक्षण मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित आपटे यांनी सोमवारी (दि.२२) नाशिक शाखेला भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आयसीएआयच्या नाशिक शाखेतर्फे सोमवारी नीमा हॉल येथे ‘जीएसटी अंतर्गत वार्षिक विवरण दाखल करणे व लेखा परीक्षण’ विषयावर चर्चासत्राच्या माध्यमातून अमित आपटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांच्या विविध शंकांचे निरसन केले.

जीएसटीसंदर्भात संस्थेने प्रकाशित केलेल्या जीएसटी व नफाखोरी विरोधी मार्गदर्शक सूचनांच्या विविध पुस्तकांविषयी



इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित आपटे यांचा सत्कार करताना प्रशांत येवले. समवेत राहुल चिंचोलकर, आर. के. देवधर, सूरज लाहोटी.

माहिती देतानाच भारतभरात सुमारे ७५ हजारहून अधिक सीएमए (कॉस्ट ॲण्ड मॅनेजमेंट अकाउंटंट) सभासद असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. राहुल चिंचोलकर यांनी जीएसटी लेखापरीक्षण व वार्षिक परतावा यांविषयी मार्गदर्शन केले. यावेळी नाशिक शाखेचे अध्यक्ष प्रशांत येवले, दीपक जोशी यांच्यासह प्रशांत येवले, रवींद्र देवधर यांच्यासह औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी आणि सीएमए सभासद व विद्यार्थी उपस्थित होते.



नाशिक : अमित आपटे यांचे स्वागत करताना नाशिक शाखेचे अध्यक्ष प्रशांत येवले, उपाध्यक्ष दीपक जोशी, राहुल चिंचोलकर.

# लेखापरीक्षण करताना काळजी घ्या!

## आयसीएआयचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित आपटे यांचे आवाहन

**नाशिक :** भारताने जुलैपासून वस्तू व सेवा कर (जीएसटी) प्रणाली स्वीकारल्यामुळे चार्टर्ड अकाउंटंट (सीए) यांची जबाबदारी वाढली आहे. जीएसटीचे अनेक पुस्तके बाजारात उपलब्ध झाली असून, त्यांचा व्यवस्थित अभ्यास करून काळजीपूर्वक लेखापरीक्षण (ऑडिट) करा, असे आवाहन आयसीएआयचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित आपटे यांनी येथे केले.

इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंटस ऑफ इंडियाच्या नाशिक शाखेतर्फे 'ॲन्युअल फायलिंग ॲण्ड ऑडिट अंडर जीएसटी' या विषयावर निमा हॉल येथे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अमित आपटे उपस्थित होते. नाशिक शाखेचे उपाध्यक्ष दीपक जोशी यांनी स्वागत केले.

यावेळी आपटे म्हणाले, जीएसटी प्रणालीविषयी मार्गदर्शन करणारे अनेक पुस्तके उपलब्ध झाली आहेत. त्यातील निवडक पुस्तकांचे वाचन करा. देशात ७५ हजारांपेक्षा अधिक सीएमए सभासद असल्याचे त्यांनी सांगितले. सीएमए राहुल चिंचोलकर यांनी 'जीएसटी ऑडिट ॲण्ड ॲन्युअल रिटर्न'संबंधी मार्गदर्शन केले. यावेळी नाशिक शाखेचे अध्यक्ष सीएमए प्रशांत येवले, सीएमए रवींद्र देवधर यांसह औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर, सीएमए सभासद व विद्यार्थी उपस्थित होते.

इस्कॉन मंदि
पौर्णिमा

नाशिक :
भावनामृत सं
द्वारा कोजा
पौर्णिमा मह
करण्यात अ
व श्री रा
सुंदर स
होती. स
कार्यक्रम
होते. मह
मंगल अ
त्यानंतर
आरती
शरद
श्रीकृ
व
महि
श्री
प्र
म
ज

# राष्ट्रीय अध्यक्ष आपटेंची नाशिक शाखेला भेट

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २३ : येथील दि इन्स्टिटयूट ऑफ कॉस्ट अकाउंट्स ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित आपटे यांनी नुकतीच नाशिक शाखेला भेट देत संवाद साधला. निमा हॉलमध्ये जीएसटीअंतर्गत वार्षिक विवरण व लेखापरीक्षण या विषयावर सहभागींना मार्गदर्शन केले.

जीएसटी प्रणालीमध्ये लहान-मोठ्या उद्योग संस्थांना तसेच सर्वसामान्य व्यापारीवर्गाला वेळोवेळी मार्गदर्शन व प्रशिक्षित करण्यात संस्थेतर्फे विविध उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी नाशिक शाखेचे उपाध्यक्ष दीपक जोशी यांनी सर्व उपस्थित सभासदांचे, प्रमुख वक्ते व संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष यांचे स्वागत केले.

अमित आपटे यांनी आयसीएसआय या इन्स्टिटयूटतर्फे घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले, की देशभरात संस्थेचे ७५ हजारांहून अधिक सभासद आहेत. जीएसटी संदर्भात संस्थेने अनेक मार्गदर्शनपर पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यात प्रामुख्याने गायडन्स नोट ऑन जीएसटी, अॅन्टी प्रॉफिटिंग या पुस्तकाचा समावेश आहे. राहुल चिंचोलकर यांनी जीएसटी लेखापरीक्षण व वार्षिक विवरणासंबंधी मार्गदर्शन केले. नाशिक शाखेचे अध्यक्ष प्रशांत येवले यांनी आसीएआयचे राष्ट्रीय अध्यक्ष सीएमए अमित आपटे यांचा सत्कार केला.